# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१९

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२०

**क्रमांक :एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन** **जाहिरात क्रमांक : १९/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण २०० पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०२०, रविवार, दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी महाराष्ट्रातील ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल** :-

**(१) सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ (एकूण १० पदे)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ५ | ५ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ५ | ३ | ८ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ७ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | १ | १ | -- | -- | २ | -- | १ | १ | ७ | -- | ७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | १ | -- | -- | १ | -- | १ | १ | ६ | -- | ६ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | १ |
| **(३) सहायक आयुक्त/प्रकल्प अधिकारी, श्रेणी-२, गट-अ (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| **(४) उद्योग उप संचालक, तांत्रिक, गट-अ (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(५) सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गट-अ (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | १ | २ |
| | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(६) उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ३ | १ | -- | १ | -- | -- | ३ | -- | ३ | ३ | १४ | ११ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | -- | १ | -- | -- | २ | -- | २ | २ | १० | ७ | १७ |
| महिला | १ | | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | ४ | ३ | ७ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पद १ - अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | | | | | | | | | | | | |
| **(७) कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५ | २ | १ | -- | २ | १ | ४ | -- | ३ | ३ | २१ | ४ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | १ | १ | -- | १ | १ | ३ | -- | २ | २ | १४ | ३ | १७ |
| महिला | २ | १ | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ७ | १ | ८ |
| दिव्यांग | एकूण पद १ - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू | | | | | | | | | | | | |
| **(८) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण १२ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | -- | -- | १ | -- | ५ | -- | २ | १ | १२ | -- | १२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | १ | -- | ३ | -- | १ | १ | ८ | -- | ८ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | -- | ४ | -- | ४ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(९) सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब (एकूण १९ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | २ | -- | -- | -- | २ | २ | -- | २ | २ | १२ | ७ | १९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | २ | -- | -- | -- | १ | २ | -- | १ | १ | ८ | ५ | १३ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | ४ | १ | ५ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पद १ - स्वमग्नता (Autism) /मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)/बहिरेपणा व अंधत्वासहबहुदिव्यांगता (multiple disability) | | | | | | | | | | | | |
| **(१०) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट- ब (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ५ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ | ४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(११) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| **(१२) सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब (एकूण ४ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| **(१४) सहायक प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी व तत्सम, गट-ब (एकूण ११ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | १ | ७ | ४ | ११ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | ५ | ३ | ८ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| **(१५) नायब तहसिलदार, गट-ब (एकूण ७३ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ८ | ४ | -- | १ | २ | २ | २० | २ | ९ | ७ | ५५ | १८ | ७३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | -- | १ | १ | १ | १३ | १ | ५ | ५ | ३५ | ११ | ४६ |
| महिला | २ | १ | -- | -- | १ | १ | ६ | १ | ३ | २ | १७ | ५ | २२ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |

**२.** पूर्व परीक्षेच्या निकालाधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षा रविवार, सोमवार व मंगळवार दिनांक २, ३ व ४ ऑगस्ट, २०२० रोजी किंवा त्यानंतर आयोजित होण्याची शक्यता आहे.

**३.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१** वर नमूद संवर्गातील पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**४.२** विद्यमान परीक्षा योजनेनुसार राज्यसेवा परीक्षेमधून शासनाच्या विविध मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील एकूण २८ संवर्गाची पदे सर्वसाधारणपणे भरण्यात येतात. त्यापैकी जाहिरातीच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या विविध १५ संवर्गातील पदे प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केली आहेत. जाहिरातीमध्ये नमूद संवर्गातील पदांव्यतिरिक्त राज्य सेवा परीक्षेमधून भरण्यात येणा-या उर्वरित संवर्गातील पदांचा तसेच विद्यमान संवर्गाव्यतिरिक्त काही नवीन संवर्गातील पदांचा नंतरच्या टप्प्यावर समावेश होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत संबंधित विभागाकडून सुधारित/अतिरिक्त अथवा नवीन संवर्गाच्या मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील व अशा सुधारित/अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**४.३** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, दिव्यांग व्यक्ती, खेळाडू, अनाथ) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

**४.४** महिला, खेळाडू तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.५** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.६** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.७** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**४.८** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

**४.९** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**४.१०** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.११** प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

**४.१२** खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**४.१३** कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**४.१४** एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**४.१५** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या संवर्ग/पदांच्या बाबतीत खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवारच संबंधित पदावर नियुक्तीसाठी पात्र अथवा अपात्र असतील :-

| अ.क्र. | पदाचे नांव | शासन आदेश | दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०१२/प्र.क्र.२१३/वि.प्र.-४<br>दिनांक ११ मार्च, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| २ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ | शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मविसे १०/२०१०/ प्र.क्र.३६६/ आस्था-३, दिनांक १४ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र |
| ३ | सहायक गट विकास अधिकारी, गट-ब | | (२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ४ | सहायक आयुक्त/प्रकल्प अधिकारी, श्रेणी-२, गट-अ | शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक आस्था-१००२/प्र.क्र.४५/का.१५, दिनांक २० ऑगस्ट, २००५ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ५ | सहायक प्रकल्प अधिकारी/सांख्यिकी अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/संशोधन अधिकारी/गृहप्रमुख/प्रबंधक,गट-ब | | |
| ६ | उद्योग उपसंचालक, तांत्रिक, गट-अ | शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभाग, क्रमांक आयएसटी-२०१०/प्र.क्र.६८२/ उद्योग-३, दिनांक १९ जानेवारी, २०११ | (३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ७ | सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गट-अ | शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक इएसई-२००४/प्र.क्र.३८/प्रशा-२, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ८ | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब | | |
| ९ | उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक अपंग-२०१०/(२१९/१०)/असंक, दिनांक २१ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १० | कक्ष अधिकारी, गट-ब | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक कअस-१३१५/प्र.क्र.१२०/१४ब दिनांक १६ एप्रिल, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ११ | सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब | शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२०११/ प्र.क्र. १७७/सुधार-३, दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १२ | उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक स ११/२००४/प्र.क्र.१४६/ई-६ दिनांक ९ जुलै, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १३ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब | शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२०१३/ प्र.क्र.३५/अ.क. २, दिनांक ३० मे, २०१८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र् |
| १४ | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १५ | नायब तहसिलदार, गट-ब | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९ दिनांक ११ जुलै, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |

**४.१६** राज्य सेवा परीक्षेमधून भरण्यात येणा-या इतर संवर्ग/पदांच्या बाबतीत दिव्यांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.१७** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**४.१८** दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**४.१९** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.२०** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**४.२१** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.२२** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**४.२३** अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.२४ कक्ष अधिकारी गट-ब वगळता इतर संवर्गाकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.२५ सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास उमेदवार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवार तसेच समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**५. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**५.१** फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित तसेच किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार आयोगाच्या पूर्व परवानगीने लेखनिकाची मदत घेता येईल व आयोगाच्या पूर्व परवानगीने अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

**५.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**५.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**५.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**५.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

**५.६** दिव्यांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, विशेष सूचना, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील “विकलांग (दिव्यांग) व्यक्ती’” या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्यांचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करावे.

**५.७** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ च्या आधारे दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत लेखनिक व अनुग्रह कालावधीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून विहित करण्यात येणा-या कार्यपध्दतीच्या आधारे कार्यवाही करण्यात येईल.

**६. वेतनश्रेणी :-**

गट-अ व गट-ब - वेतन मॅट्रिक्समधील संबंधित वेतन स्तरानुसार.

**७. पात्रता :-**

**७.१** भारतीय नागरिकत्व

**७.२ वयोमर्यादा :-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान अमागास / मागासवर्गीय/ अनाथ | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | |
| **१ एप्रिल, २०२०** | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**७.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**७.४ शैक्षणिक अर्हता :-**

७.४.१ उपलब्ध पदसंख्येतील उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ या संवर्गातील पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**७.४.२** उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी, किंवा

(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी

**७.४.३** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील, परंतु पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**७.४.६** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

**७.४.७** सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

**७.५ शारीरिक मोजमापे/अर्हता :-**

**७.५.१ वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत खालील पदाकरीता त्यांच्या पदनामासमोर दर्शविल्याप्रमाणे उमेदवारांची शारीरिक मोजमापे/अर्हता असणे आवश्यक आहे :-**

**उप अधिक्षक, गट-ब राज्य उत्पादन शुल्क -**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| (१) **उंची - १६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)**<br>(२) **छाती - न फुगविता ७९ से.मी.,**<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक** | **उंची - १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)** |

७.५.२ उपरोक्त संवर्ग/पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता (लागू असेल त्याप्रमाणे) अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

७.५.३ प्रस्तुत राज्य सेवा परीक्षेमधून भरण्यात येणा-या काही संवर्गाच्या बाबतीत शारीरिक मोजमापे/विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असून अशा अर्हतेबाबतच्या सविस्तर तरतुदी मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील.

७.५.४ विहित शैक्षणिक अर्हता (लागू असेल त्याप्रमाणे) अर्जामध्ये आढळून न आल्यास संबंधित संवर्गासाठी उमेदवारांचा पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही.

**८. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**८.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

८.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

८.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

८.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**८.२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन-०५१४/प्र.क्र.७/१४/१८-ब, दिनांक २४ एप्रिल, २०१५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार परिविक्षाधीन नियुक्तीवर रुजू होणा-या उमेदवारांस ठराविक रकमेचे बंधपत्र (Bond) देणे आवश्यक राहील.

**८.३** महाराष्ट्र नागरी सेवा (महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट-"अ" आणि गट-"ब" (राजपत्रित), या पदाकरीता निवड होऊन सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवा ज्येष्ठता निश्चित करणे) नियम, २०१५ तसेच तद्नंतर शासनाकडून यासंदर्भात जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित संवर्गातील परस्पर सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**९. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**९.१** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**९.२** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**९.३** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**९.४** पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदभार्तील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**१०. परीक्षेचे टप्पे - तीन**

प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा गुण - ४००
(२) मुख्य परीक्षा गुण - ८००
(३) मुलाखत गुण - १००

**११. पूर्व परीक्षेकरीता शुल्क (रुपये) : ८.१** :- अमागास - **रु. ५२४/- ८.२** :-मागासवर्गीय व अनाथ - **रु. ३२४/-**

**१२. अर्ज करण्याची पद्धत :-**

**१२.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**१२.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २३ डिसेंबर, २०१९ ते १३ जानेवारी, २०२०** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**१२.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१२.४** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**१२.५** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**१२.६** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१२.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

१२.७.१ शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक करावे.

१२.७.२ '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर '**माझे अप्लिकेशन**' सदरातील '**स्पर्धात्मक परीक्षा**'या लिंक वर क्लिक करावे.

१२.७.३ '**स्पर्धात्मक परीक्षा**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. '**Unpaid**' लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

१२.७.४ '**Pay Now** ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

१२.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

१२.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२.७.७ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

१२.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१२.७.९ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१२.७.१० चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १४ जानेवारी, २०२० पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१२.७.११** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१२.८ केंद्र निवड :-**

**१२.८.१** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**१२.८.२** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**१३. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१३.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.३** परीक्षेस येतेवेळी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची रंगीत छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१३.४** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट प्रतीमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१३.५** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१४. परीक्षेस प्रवेश**

**१४.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**१४.२** स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**१४.३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१५. बायोमॅट्रिक पडताळणी :**

**१५.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuineness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

**१५.२** बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

**१५.३** बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते.

**१५.४** परीक्षेच्यावेळी बायोमॅट्रिक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवून परीक्षेस प्रवेश नाकारला जावू नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता परीक्षेच्या दिवशी उमेदवाराने हातावर मेंहदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू/पदार्थ लावू नये.

**१५.५** उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

**१६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा

परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षेची योजना**" विभागातील ' **राज्य सेवा परीक्षेची परीक्षा योजना**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१७.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१८.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : २३ डिसेंबर, २०१९

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.